जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळास कृपया भेट द्या - https://wrd.maharashtra.gov.in"

जा.क्र.मकृखोविम/काक-२/१९/(४४७/२०१७)/७०

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,
सिंचनभवन, बारणे रोड,मंगळवार पेठ,
पुणे-४११ ०११ दिनांक: ०६/०१/१८

प्रति,

सहायक संचालक (जाहीरात),
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मंत्रालय,मुंबई-३२

**विषय : महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,पुणे करार तत्वावर वकिलनियुक्तीसाठी जाहिरात प्रसिध्दीबाबत.**
**(प्रामुख्याने दैनिक सकाळ, दैनिक लोकमत व दैनिक लोकसत्ता या वृत्तपत्रांत)**

विषयांकित प्रकरणी संदर्भिय जाहिरात प्रसिध्दी करिता पाठवित असून प्रसिध्दी मिळणेबाबत विनंती आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | कार्यालयाचे नाव | महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,सिंचन भवन,मंगळवार पेठ,बारणे रोड,पुणे |
| २ | वृत्तपत्रात जाहिरात सुचना प्रसिध्द होण्याचा अंतिम दिनांक | १२/०१/२०१८ |
| ३ | प्रसिध्दी कोणत्या स्तरावर आवश्यक आहे. | जिल्हा व राज्यस्तर मराठी वर्तमान पत्रात(प्रामुख्याने दैनिक सकाळ, दैनिक लोकमत व दैनिक लोकसत्ता या वृत्तपत्रांत) |
| ४ | जाहिरातीचे बील/देयक कोणाकडे पाठवायचे | महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,सिंचन भवन,मंगळवार पेठ,बारणे रोड,पुणे |
| ५ | जाहिरात किती वेळा प्रसिध्द करावयाची आहे. | एका वेळेस |

सोबत:जाहिरातीचा मसुदा (६ प्रती)

६/१/१८
अधीक्षक अभियंता तथा
सदस्य सचिव निवड समिती
म.कृ.खो.वि.म.पुणे-११

प्रत:संग्रहार्थ-२०१८

E:\KK1(A)\पॅनल वकील नियुक्ती बाबत.docx

[redacted]

१०३

# जाहिरात

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, सिंचनभवन, मंगळवार पेठ, पुणे-११

## करार तत्वावर वकिलांची नियुक्तीबाबत.

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे कार्यालयाकडून पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, बीड, उस्मानाबाद व अहमदनगर या जिल्हयामधील विविध दिवाणी न्यायालयामधील तसेच कामगार न्यायालय, औद्योगिक न्यायालय, मोटार अपधात न्यायाधिकरण, हरित न्यायाधिकरण इत्यादी समोरील न्यायालयीन प्रकरण चालविणे करिता विविध ठिकाणच्या न्यायालयात / न्यायाधिकरणात वकिलांची करार तत्वावर नियुक्ती करणे करिता दिनांक १५/०१/ २०१८ ते दिनांक ०५/०२/ २०१८ या कालावधीत ई-मेलद्वारे (edmkvdcpune@gmail.com) अर्ज मागविण्यांत येत आहे. सदर वकीलांचे पॅनल मध्ये नांव समाविष्ट करण्यासाठी आवश्यक पात्रता इतर अटी व शर्ती तसेच विधी शुल्काचे परिपत्रक इत्यादीं बाबतची सविस्तर माहिती महामंडळाच्या www.wrd.maharashtra.gov.in या (वेबसाईटवर) संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत आली आहे. अर्ज केवळ ई-मेलद्वारेच स्विकारले जातील. त्याबाबत कसलाही पत्रव्यवहार केला जाणार नाही. तसेच पुढील सर्व सुचनाही उपरोक्त संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येतील. सध्याचे पॅनलमधील इच्छुक वकिल उमेदवारांनी देखील नव्याने अर्ज सादर करणे अनिवार्य राहील(पॅनल वरील वकिलांना नेमून द्यावयाच्या कामकाजाचा अधिकार महामंडळास राहील.) अर्ज प्राप्त झाल्यानंतर अर्जांची छाननी करण्यात येईल व पात्र अर्जदारांना तोंडी मुलाखतीसाठी बोलवण्यात येईल.

टिप : १) न्यायालयाचे ठिकाण जेथे करार तत्वावर वकिलांचे पॅनल तयार करावयाचे आहे. (१) पुणे (२) बारामती (३) खेड-राजगुरुनगर (४) सातारा (५) कराड (६) वडूज (७) कोल्हापूर (८) गडहिंग्लज (९) इचलकरंजी, (१०) सांगली (११) सोलापूर (१२) बार्शी (१३) पंढरपूर (१४) अहमदनगर (१५) श्रीगोंदा (१६) उस्मानाबाद (१७) भूम-परांडा, (१८) उमरगा (१९) बीड (२०) अंबेजोगाई.

२) सध्या अस्तित्वात असलेल्या पॅनलमधील इच्छुक वकील उमेदवारांनी नव्याने अर्ज सादर करणे अनिवार्य राहील. नवे पॅनल कार्यरत झाल्यावर पुर्वीचे / सध्याचे पॅनल आपोआप बरखास्त झाले असे समजण्यांत येईल.

**अधीक्षक अभियंता**
**म.कृ.खो.वि.म,पुणे तथा सदस्य सचिव**
**वकील पॅनेल निवड समिती**

\\Comp01\e\EC-8\जाहिरात मकृखोविम. 2017.doc1

## Terms and Condition for applying for the Panel Advocate of Distrcit Courts, Civil Adminal Court, MACT, Green Tribunaol,etc. for Maharashtra Krishna Valley Development Corpoeation (MKVDC)

**Part- A**

1. The Applicant should be practicing advocate and should have at least 5 years experience of conducting in Civil, Criminal, Labour and Industrial, Service matters, as the case may be as on 01-11-2017 (However seniority in the profession will be counted as an addition)
2. Applicant shall have knowledge and skill of communication by E-mail/internet /computerised system.
3. Every applicant shall submit a non-refeundable Demand Draft of Rs.100/- in favour of Executive Director, MKVDC, Pune drawn on .Executive Engineer, Maharashtra Krishna Valley Development Corporation, Pune
4. Applicant shall be interviewed by a commiittee formed by Executive Director, MKVDC, Pune.
5. The period of Appointment on panel shall be 2 years initially and may be extended at the pleasure of Executive Director, M.K.V.D.C. Pune.
6. Appointment as Govt.Pleader/Additional Govt.Pleader /Asst. Govt. Pleader shall be treated as disqualification for appointment and working on the Panel of M.K.V.D.C.
7. Applicant shall have to appear before Interview Committee formed by Executive Director, M.K.V.D.C., Pune.
8. Interview shall be for 50 marks. Applicant securing less than 50% marks shall not be selected.
9. No TA.-DA. or other any expenses shall be admissible or honored, if applicant opts to work in local or outstation Courts.
10. Applicant shall not have been debarred from practicing as an advocate for any period by Competant Authority.
11. M.K.V.D.C. reserves its rights not to call any applicant for interview without assigning any reasons.
12. Canvassing for selection of the applicant in any way shall debar him from process of selection.
13. Incomplete application shall not be considered.

06/1/18

**Part- B**

14. Eligible and suitable applicants will be informed by Email, the place, date and time of interview and will have to appear before Interview Committee of M.K.V.D.C for assessing his suitability or otherwise for panel advocate at his own expences.
15. Applicant Advocate will have to appear on the appointed day and time with his/her own expenses before the interview committee along with original certificates regarding his education qualifications, 'Sanad' issued by the Bar Council of Maharashtra and Goa, certificate showing his age and experience of standing practice issued by the Registar of the Hon'ble District Court or President of Bar Association District Court, or Local Bar Association, where he is practicing.
16. The interview committee of M.K.V.D.C. shall assess the Legal and general knowldge, skill of presentation for the suitability or otherwise of the applicant candidate for selection on merit.
17. The decision of Executive Director, M.K.V.D.C. shall be final in the selection matter.
18. Selected Applicant Advocates will have to execute consent letter about terms and conditions in favour of Executive Director, M.K.V.D.C. Pune.
19. Reasons for selection or non selection shall not be Intimated/ communicated to anybody.
20. No correspondence from applicants in this respect shall be entertained.

**Part- C**

21. Applicant, if selected, shall not engage himself in any matter or case, inside or outside Court, against the interest of Maharashtra Krishna Valley Development Corporation (M.K.V.D.C.), Pune.
22. Applicant will have to work in the case/matter assigned to him till the end of that case or until further instructions given by M.K.V.D.C. In case of contrary instructions are issued, the panel advocate will have to give "No Objection Certificate" for conducting the matter further to any other Advocate appointed by M.K.V.D.C. and will have to hand over the brief with all papers and documents of case.
23. Applicant will have to work with the fee structure exist at the time of assignment of case by M.K.V.D.C in such type of cases.
24. He shall file case, Vakil Patra etc. on behalf of M.K.V.D.C to prosecute or defend, as the case may be, at the earliest and take all the further necessary steps in time

and make a back reference to Executive Engineer concerned and Legal Adviser concerned of M.K.V.D.C by Email within 3 Days, having done so along with details of case no, name of parties, date of filing and next stage in the matter.

25. Applicant shall intimate in writting and by e-mail within 7 days from receipt of his appointment letter and case paper to Executive Engineer concerned and concerned Legal Adviser M.K.V.D.C regarding the Court fees, expenses and Advocate fee required to be paid at that stage, in concerned matter.
26. Applicant shall file proceeding within 7 days from receipt of Court fee, Advocate fee, Expences etc to him and inform by e-mail the date of filing proceeding, number and next date in that case with stage of case to concern Executive Engineer and concern Legal Adviser, M.K.V.D.C without fail.
27. Applicant shall also intimate the interim orders in the matter to concern Executive Engineer and Concern Legal Advisor, M.K.V.D.C. by e-mail without delay, and take further necessary actions needed in the matter without delay.
28. Applicant shall also intimate the final order or decision of the case within 3 days from date of decision by e-mail to concerned Executive Engineer and concerned Lagal Advisor M.K.V.D.C with his opinion or comment.
29. Applicant shall submit an application for certified copy of Interim order/Final order/Judgment within 3 days from the pronouncement and deposit the required copying fees/charges in Court/Tribunal, at the earliest and obtain copy without delay and send it to concern Executive Engineer and concern Legal Advisor M.K.V.D.C with his opinion immediately.
30. Applicant will have to give Legal Advice whenever needed to the concern Executive Engineer and officers of M.K.V.D.C in the matter.
31. In case the Panel Advocate wants to withdraw from the panel of Advocates or from any case assigned to him, he will have to inform about it in writting at least one month before his withdrawal to concern Executive Engineer and concern Legal Advisor of M.K.V.D.C. In that case, he will have to give 'No Objection' and all the papers and documents of the pending cases to newly appointed/substituted advocates immidiatly and he shall not be entitled to further remaining profeesional / Advocate fees.

32. Applicant shall follow all instructions,circulars,guidlines-rules of litigation issued by Legal Department of M.K.V.D.C, time to time, without delay.

**Part- D**

33. Applicant shall submit the final bill within 15 days from date of decision claiming his remaining Advocate fees plus cost/expenses if any required for copying fee and actual expences, incurred by him in the prescribed proforma to concern Executive Engineer. The bill submitted thereafter will not be honoured.
34. Applicant shall intimate by Email and in writting the change, if any, of his address and Telephone No, the stoppage of profession, advocacy to Executive Director, M.K.V.D.C and concern Executive Engineer within 7 days.
35. Failure to act promptly by applicant advocate leading to incurring losses to M.K.V.D.C will entitle to the removal of his name from panel and he will also be liable for the losses to M.K.V.D.C, if any. The decision of Executive Director, M.K.V.D.C shall be final and binding upon such advocate.
36. M.K.V.D.C also reserves its rights to engage additional Advocates or Sr. Advocates at any stage in any case.
37. M.K.V.D.C. reserves its all rights to add, subtract or change any of conditions mentioned above and also the fee structure and number of panel advocates without giving reason or prior intimation.

## 1.00 Prescribed Application

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Full Name of Applicant | : | |
| 2 | Date of Birth | : | |
| 3 | Address for Correspondence | : | |
| 4 | Phone No. & or Mobile No. | : | |
| 5 | E-Mail ID | : | |
| 6 | Educational Qualification | : | |
| 7 | Date of 'Sanad' issued by the Bar Council of Maharashtra & Goa. | : | |
| 8 | Experience in years as practicing Advocate in court / courts | : | |
| 9 | The place of court and preterence given by applicant in that respect No. of cases finally conducted in court / court by applicant in Last three years | : | |

महामंडळांतर्गत विविध न्यायालयातील
प्रकरणे हाताळण्यासाठी जिल्हा न्यायालय,
औद्योगिक न्यायालय, महाराष्ट्र प्रशासकीय
न्यायाधिकरण येथील महामंडळाच्या
पॅनेलवरील वकीलांच्या विधी शुल्कामध्ये
सुधारणा करणेबाबत

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे

## परिपत्रक

**संदर्भ :** महामंडळाचे परिपत्रक जा.क्र.मकृखोविम/आ-८/००७१५०, दि.२१/७/२०००.

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाची स्थापना महाराष्ट्र अधिनियम १५ सन १९९६ अन्वये झाली आहे. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या स्थापनेनंतर महामंडळाकडे विविध प्रकारची स्थावर व जंगम मालमत्ता निर्माण झालेली असून त्याअनुषंगाने व इतर विविध प्रकारची न्यायालयीन प्रकरणे विविध न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ट आहेत. सदर प्रकरणे हाताळण्यासाठी महामंडळाच्या पॅनेलवर करार तत्वावर वकीलांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या असून त्याबाबत त्यांना सध्या महामंडळाच्या संदर्भिय परिपत्रकातील दरानुसार विधी शुल्क मंजूर करण्यात येते. मागील १३ वर्षामध्ये या विधी शुल्कामध्ये वाढ करण्यात आलेली नाही.

न्यायालयीन प्रकरणात मोठया रकमा अंतर्भूत असतात व महामंडळाची बाजू योग्य प्रकारे प्रभावीपणे मांडली न गेल्यास न्यायालयाचा निर्णय महामंडळाचे विरुध्द जाण्याची शक्यता असते. त्यामुळे महामंडळास मोठा आर्थिक भार सोसावा लागण्याची शक्यता असते. महामंडळाने उपरोक्त संदर्भान्वये निर्धारित केलेले शुल्क कमी आहे. या सबबी खाली कित्येक न्यायालयीन प्रकरणी कामकाज पाहण्यास वकील तयार नसतात असे दिसून आले आहे. न्यायालयीन प्रकरणी उत्तमोत्तम वकीलामार्फत महामंडळाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी वकीलांना वाजवी शुल्क देण्याचा प्रस्ताव महामंडळाच्या नियामक मंडळाच्या दिनांक ३१/७/२०१३ रोजीच्या ७७ व्या बैठकीत ठराव निर्णयार्थ सादर केला आहे. सदर बैठकीतील पारित झालेल्या ठराव क्र.७७/४ नुसार महामंडळांतर्गत विविध न्यायालयातील न्यायालयीन प्रकरणे हाताळण्यासाठी महामंडळाच्या पॅनेलवरील वकीलांना दिनांक १/९/२०१३ पासून खाली नमूद केल्यानुसार सुधारीत विधी शुल्क मंजूर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | न्यायालयीन प्रकरणांचा प्रकार | विधीशुल्क (रुपये) |
|---|---|---|
| १. | जिल्हा न्यायालयातील भूसंदर्भ प्रकरणे ( लोकन्यायालयातील प्रकरणांसह ) | |
| | अ) एका प्रकरणासाठी | ३५००/- (१५००/- प्रकरण दाखल केलेनंतर २०००/- निकाल लागलेनंतर) |
| | ब) एका वेळी तीनपेक्षा जास्त प्रकरणे एकत्र चालणार असतील तर | १०५००/- (५०००/- प्रकरण दाखल केलेनंतर ५५००/- निकाल लागलेनंतर) |

| अ. क्र. | न्यायालयीन प्रकरणांचा प्रकार | विधीशुल्क (रुपये) |
|---|---|---|
| २. | जिल्हा न्यायालयातील इतर दिवाणी प्रकरणे<br>अ) रुपये ३ कोटीपर्यंत | १००००/- (५०००/- प्रकरण दाखल केलेनंतर ५०००/- निकाल लागलेनंतर) |
| | ब) रुपये ३ कोटीचे पुढील | १५०००/- (७५००/- प्रकरण दाखल केलेनंतर ७५००/- निकाल लागलेनंतर) |
| ३. | कामगार न्यायालयातील प्रकरणे<br>अ) एका प्रकरणासाठी | ३०००/- (१५००/- प्रकरण दाखल केलेनंतर १५००/- निकाल लागलेनंतर) |
| | ब) एका वेळी तीनपेक्षा जास्त प्रकरणे एकत्र चालणार असतील तर | ९०००/- (४५००/- प्रकरण दाखल केलेनंतर ४५००/- निकाल लागलेनंतर) |
| ४. | औद्योगिक न्यायालयातील प्रकरणे<br>अ) एका प्रकरणासाठी | ५०००/- (२५००/- प्रकरण दाखल केलेनंतर २५००/- निकाल लागलेनंतर) |
| | ब) एका वेळी तीनपेक्षा जास्त प्रकरणे एकत्र चालणार असतील तर | १०५००/- (५०००/- प्रकरण दाखल केलेनंतर ५५००/- निकाल लागलेनंतर ) |
| ५. | ग्राहक मंचातील प्रकरणे<br>अ) एका प्रकरणासाठी | ३०००/- (१५००/- प्रकरण दाखल केलेनंतर १५००/- निकाल लागलेनंतर) |
| | ब) एका वेळी तीनपेक्षा जास्त प्रकरणे एकत्र चालणार असतील तर | ९०००/- (४५००/- प्रकरण दाखल केलेनंतर ४५००/- निकाल लागलेनंतर) |
| ६. | महाराष्ट्र प्रशासकीय न्यायधीकरणातील प्रकरणे (मॅट)<br>अ) एका प्रकरणासाठी | ७०००/- (३५००/- प्रकरण दाखल केलेनंतर ३५००/- निकाल लागलेनंतर) |
| | ब) एकत्रित प्रकरणे असल्यास पुढील प्रत्येक प्रकरणासाठी | २०००/- (१०००/- प्रकरण दाखल केलेनंतर १०००/- निकाल लागलेनंतर) |
| ७. | दरखास्त प्रकरणे / रक्कम वसुली / Execution Petition /Recovery of Decreetal Amount etc.<br>अ) एका प्रकरणासाठी | २५००/- (१०००/- प्रकरण दाखल केलेनंतर १५००/- निकाल लागलेनंतर) |
| | ब) एका वेळी तीनपेक्षा जास्त प्रकरणे एकत्र चालणार असतील तर | ७५००/- (३५००/- प्रकरण दाखल केलेनंतर ४०००/- निकाल लागलेनंतर) |
| ८. | कलम ८० सीपीसी किंवा इतर प्रकरणी नोटीसीना कायदेशीर उत्तर तयार करुन देणे (प्रतिनोटीस). | १०००/- |
| ९. | खाजगी वाटाघाटीनी जमीन खरेदी करणे, त्यासाठीचे सर्च रिपोर्ट व खरेदी खत तयार करणे (प्रति खरेदी खत ) | १५००/- ( कार्यवाही झालेनंतर ) |

टिप :

१) एखादे भूसंदर्भ प्रकरण लोकन्यायालयात वर्ग झाल्यास सदर प्रकरण ज्या वकीलांकडे तो भूसंदर्भ जिल्हा न्यायालयात चालू होता, त्याच वकीलाने लोकन्यायालयामध्ये हाताळणे आवश्यक आहे. त्याकरिता वेगळे विधी शुल्क अदा केले जाणार नाही.

२) न्यायालयीन प्रकरणांचा निकाल महामंडळाच्या म्हणण्यानुसार पूर्णपणे महामंडळाच्या बाजूने लागल्यास उपरोक्त नमूद विधीशुल्कांच्या ५० टक्के इतकी अतिरिक्त रक्कम प्रोत्साहन म्हणून संबंधीत वकीलास देय राहील. त्याकरिता संबंधीत वकीलांने सर्व कागदपत्रासह प्रस्ताव महामंडळाच्या कायदा कक्षाकडे सादर करणे आवश्यक राहिल.

३) उपरोक्त नमूद विधीशुल्काशिवाय कोर्ट फी.स्टॅम्प फी इत्यादी स्वतंत्रपणे देय राहील.

४) वरीलप्रमाणे सुधारित दर दि.१.९.२०१३ पासून नव्या तसेच चालू प्रकरणांसाठी (म्हणजे ज्या प्रकरणांचा अद्याप निकाल लागलेला नाही ) लागू राहतील.

५) उपरोक्त प्रस्तावीत विधी शुल्का व्यतिरिक्त अनुषंगीक खर्च महामंडळाचे परिपत्रक जा.क्र.मकृखोविम/ आ-८/६२- २०१३/ २५२० दि.३०/०३/२०१३ अन्वये देय राहील.

६) महामंडळांतर्गत उच्च न्यायालयातील प्रकरणे हाताळण्यासाठीचे विधी शुल्क महामंडळाचे परिपत्रक जा.क्र.मकृखोविम/आ-८/(६२/२०१३)/०२५२, दि.३०/३/२०१३ अन्वये देय राहील.

(भा.का.भांगरे)
**विशेष अधीक्षक**
**म.कृ.खो.वि.म., पुणे ११**

जा.क्र.मकृखोविम/काक-१/(६२/२०१३)/ 09580
महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,
सिंचन भवन, बारणे रोड, पुणे-११
दिनांक : 20/8/13
**स्थळ प्रत मा.का.सं. यांचे मान्यतेने.**

प्रत : मुख्य अभियंता (जसं/वि.प्र), जलसंपदा विभाग, पुणे यांना माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी.

प्रत : **मुख्य लेखा व वित्त अधिकारी, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांना माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी**

प्रत : **अधीक्षक अभियंता (महामंडळातील सर्व) यांना माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी**

प्रत : **कार्यकारी अभियंता १ /२ / ३ महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांना माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी**

प्रत : **प्रकल्प शाखा / आस्थापना शाखा / भांडार शाखा / रेखा शाखा / लेखा शाखा (महामंडळ कार्यालय) यांना माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी**

प्रत : परिपत्रक धारिका सन २०१३ साठी.

# परिपत्रक

विषय : महामंडळाच्या पॅनेलवरील वकीलांना विधी शुल्का व्यतिरिक्त इतर अनुषंगिक खर्च मंजूर करणेबाबत.

महामंडळांतर्गत न्यायालयीन प्रकरणे हाताळण्यासाठी वकीलांना प्रत्येक प्रकरणनिहाय महामंडळाने निश्चित केल्यानुसार विधी शुल्क अदा केले जाते. न्यायालयीन प्रकरणे दाखल करताना / दाखल केल्यानंतर कोर्ट फी, प्रवास खर्च, वाहन खर्च, दूरध्वनी खर्च, लेखन सामुग्री व इतर अनुषंगिक खर्च वकीलांना करावा लागतो. सध्या या खर्चापोटी काहीही प्रतिपूर्ती केली जात नाही. सदर बाबीकरिता कराव्या लागणाऱ्या खर्चाची प्रतिपूर्ती मिळावी अशी मागणी महामंडळाच्या पॅनेलवरील वकीलांनी केलेली होती.

सदर अनुषंगिक शुल्क अदा करणेबाबत महामंडळाच्या नियामक मंडळाच्या दि.२७/२/२०१३ रोजीच्या ७२ व्या बैठकीत ठराव निर्णयार्थ सादर केला होता. सदर बैठकीतील पारित झालेल्या ठराव क्र.७२/४ नुसार महामंडळांतर्गत न्यायालयीन प्रकरणे हाताळण्यासाठी वकीलांना विधी शुल्का व्यतिरिक्त कोर्ट फी, प्रवास खर्च, वाहन खर्च, दूरध्वनी खर्च, लेखन सामुग्री व इतर अनुषंगिक खर्च करण्यासाठी उच्च न्यायालयातील प्रकरणासाठी रु.५०००/-, जिल्हा न्यायालयातील प्रकरणी रु.१५००/- व कामगार न्यायालय / औद्योगिक न्यायालय / मॅटमधील प्रकरणासाठी रु.१०००/- प्रति प्रकरण अशी ठोक रक्कम देण्याबाबत नियामक मंडळाने मान्यता दिलेली आहे.

तसेच तीन पेक्षा जास्त प्रकरणे एकत्रित चालणार असतील अशा वेळी वर नमूद अनुषंगिक शुल्काच्या जास्तीत जास्त तीन पट शुल्क देय राहील. नवीन प्रकरणासाठी ५० टक्के रक्कम प्रकरण सुरु होताना व उर्वरित ५० टक्के रक्कम प्रकरणाचा निकाल लागल्यानंतर देय राहील. सध्या प्रगती पथावरील न्यायालयीन प्रकरणासाठी वरीलपैकी ५० टक्के रक्कम देय राहील.

जा.क्र.मकृखोविम/आ-८/(६२/२०१३)/ 2520
महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,
सिंचन भवन, बारणे रोड, पुणे-११
दिनांक : 30 MAR 2013
मा.का.सं. यांचे मान्यतेने.

( भा.का. भांगरे )
विशेष अधीक्षक
म.कृ.खो.वि.म.,पुणे ११

D:\EC-8\Circular doc (2)

प्रत : मुख्य अभियंता (जसं/वि.प्र), जलसंपदा विभाग, पुणे यांना माहितीसाठी व उचि कार्यवाहीसाठी.

प्रत : मुख्य लेखा व वित्त अधिकारी, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यां माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी

प्रत : अधीक्षक अभियंता (महामंडळातील सर्व) यांना माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी

प्रत : प्रकल्प शाखा / आस्थापना शाखा / भांडार शाखा / रेखा शाखा / लेखा शाख (महामंडळ कार्यालय) यांना माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी

प्रत : परिपत्रक धारिका सन २०१३ साठी.